दैनिक **वादळ वार्ता**


महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.२ फेब्रुवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १५८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 2 Feburary 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 158 ● Pages 4 ● Rate 4 Rs







# लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार: ज्या उमेदवाराच्या मागे महिला,त्याचा नंबर पहिला

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची कोल्हापुरातून मोठी घोषणा

**दैनिक वादळ वार्ता**

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे हा शब्दाचा पक्का आहे, लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय थांबणार नाही. लवकरच आम्ही लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार, असे विधान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. कोल्हापूरच्या कागल येथे एका जाहीर सभेत ते बोलत होते. ज्या उमेदवाराच्या मागे महिला, त्याचा मत पेटीत नंबर पहिला. त्यामुळे दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला असल्याचे यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले.आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रचार सुरू झाल्या आहेत. एकनाथ शिंदे हे आज कोल्हापूर दौऱ्यावर असून यावेळी बोलताना त्यांनी सुरुवातील दिवंगत अजित पवारांना अभिवादन केले. ते म्हणाले, अशा दुःखात देखील आम्हाला प्रचाराला यावे लागत आहे. या निवडणुका लढवय्या कार्यकर्त्यांच्या असतात, त्या पुढे ढकलता येत नाहीत. आम्ही प्रचार साधेपणाने करतो, कोणाच्या भावना दुखावणार नाहीत याची काळजी घेतो, असे शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, कोल्हापूरच्या मातीला एक वेगळा सुगंध आहे. संजय मंडलिक तुम्ही एकटे नाहीत, ही जनता तुमच्या सोबत आहे.



काही लोक स्वतःच्या स्वार्थासाठी एकत्र आली आहेत. ही लढाई जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशीह आहे आणि या लढाईत नेहमी जनशक्ती जिंकते. सत्तेसाठी एकत्र आला असला तरी जनता ठरवते कोणाला आपले मत द्यायचे, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.लाडकी बहीण योजनेविषयी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय एकनाथ शिंदे थांबणार नाही. दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला आहे. लाडक्या बहिणींना आम्ही लवकरच २१०० रुपये देणार आहोत, असे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिले आहे.

तसेच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक ही पक्षाची पाया रचणारी निवडणूक आहे. मी आज नेहमी सारखे भारण करणार नाही. केवळ कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर प्रचाराला आलो आहे, असे एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केले. नगरपरिषद आणि महानगरपालिका पालिका निवडणुकीत शिवसेना राज्यात दुसऱ्या नंबरचा पक्ष राहिला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेनेचे ५ आमदार आहेत आणि एक खासदार आहे. संजय मंडलिक गेल्या वेळी थोडक्यात सुटले, पुढच्या वेळी नक्की बरोबर पकडतील असा विश्वासही एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

## प्रा.मनोहर धोंडे सर यांच्या ६१ व्या वाढदिवसा निमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे भव्य आयोजन


**दैनिक वादळ वार्ता**

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आणि सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख आदरणीय प्रा. मनोहररावजी धोंडे सर यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त दिनांक २ फेब्रुवारी रोजी लोहा येथे विविध सामाजिक व अभिष्टचिंतन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा संपूर्ण कार्यक्रम सेवा जनशक्ती पार्टी शाखा लोहा व शिवा संघटना शाखा लोहा यांच्या वतीने साजरा करण्यात येणार आहे.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक, लोहा येथे प्रा. मनोहर धोंडे सर यांच्या पुष्पवृष्टी व सत्कार सोहळ्याने होणार आहे. त्यानंतर डॉ. हेलन केलर अंध निवासी विद्यालय येथे फळवाटप व सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, समाजातील दुर्बल घटकांप्रती सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात येणार आहे.

यानंतर माळाकोळी ,बेरळी सावरगाव,शिराढोन,व कंधार येथील महाराणा प्रताप चौक, कंधार येथे कार्यक्रम होणार असून, पुढे व्यंकटेश मंगल कार्यालय, लोहा येथे भव्य अभिष्टचिंतन सोहळा संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. गोविंद आण्णा केंद्रे आमदार, उदगीर विधानसभा हे असणार आहेत. तसेच



कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. शहाजी उमाप साहेब, विशेष पोलिस महानिरीक्षक, नांदेड यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख व्याख्याते म्हणून मा. श्री. पंजाबराव पाटील डख प्रसिद्ध हवामान अभ्यासक यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या अभिष्टचिंतन सोहळ्यास शिवा संघटनेचे पदाधिकारी, मावळे, सेवा जनशक्ती पार्टीचे कार्यकर्ते, शेतकरी बांधव तसेच लोहा तालुक्यातील व्यापारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन शिवा संघटनेचे तालुकाप्रमुख रविराज होळगे व सेवा जनशक्ती पार्टी चे तालुकाध्यक्ष – गोविंद हाबगुंडे यांनी केले आहे.प्रा. मनोहर धोंडे सर यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील कार्याचा गौरव करणारा हा कार्यक्रम लोहा तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात येत आहे.

## मेघवालापाडा शाळेत चिमुकल्यांचा बाल आनंद मेळावा

**दैनिक वादळ वार्ता**

**पालघर । प्रतिनिधी**

मेघवालापाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी बाल आनंद मेळावा भरून ग्रामस्थांना सुखद अनुभव दिला. शाळेच्या पटांगणात सजावट करून बाजार भरवत बाळ आनंद मेळावा साजरा करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञाना बरोबरच व्यवहारिक ज्ञान आर्थिक बाबींची जाण व्हावी तसेच मुक्त वातावरणात ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी जिल्हा परिषद शाळेने बाळ आनंद मेळावा आयोजित केला होता. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल लावत आनंद साजरा केला. प्रामुख्याने ढोकळा भेळ पाणीपुरी गुलाबजाम तुरीच्या शेंगा भुजिंग वालाच्या शेंगा भजी चना चटपटी पॉपकॉर्न वडापाव भाजीपाला इडली आदींचे स्टॉल लावले होते या बाळ आनंद मेळाव्याचे माध्यमातून मुलांना व्यावसायिक कौशल्यासह आलेल्या ग्राहकांशी सुसवांद कला व्यक्तिमत्व विकास यासह मूल्यांचे संस्कार मिळाले. विद्यार्थ्यांनी विविध वस्तू व पदार्थ यांची खरेदी व विक्री केल्याने आर्थिक व्यवहारचे ज्ञान मिळाले. यावेळी पालकांनी आनंद मेळाव्यातील वस्तू मोठ्या प्रमाणात खरेदी केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहात होता. विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना देणारे विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री गुरुनाथ लहांगे यांनी केले.या कार्यक्रमास सरपंच श्री कैलास टोके,शाळा व्यवस्थापन समिती व बहुसंख्य पालक वर्ग उपस्थित होता.

## रासेयो शिबिरातून स्वच्छतेची जनजागृती; स्वच्छ गाव,सुंदर गाव मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक वादळ वार्ता**

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे शिवणी येथे सुरू असलेल्या सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत ‘स्वच्छ गाव, सुंदर गाव’ हा उपक्रम शुक्रवारी उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर तसेच विविध भागांची स्वच्छता करून ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती केली.यावेळी विद्यार्थ्यांनी सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन, कचरा वर्गीकरण तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व ग्रामस्थांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी गावाजवळील नदी स्वच्छ करून जलसंवर्धनाचा संदेश दिला.



नदी परिसरातील कचरा व गाळ काढून नदी स्वच्छ करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. तसेच शोषखड्डे व पाझर खड्डे तयार करून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याबाबतही जनजागृती करण्यात आली.ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत उत्स्फूर्त सहकार्य केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.सुनील जोंधळे, प्रा. किशोर वाघमारे, प्रा.सुरेश वाघमारे, प्रा.श्वेता वंजारे, प्रा. वृषाली लोखंडे, प्रा. सुप्रिया ससाणे तसेच प्रा.रंजना जोगदंड यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे सर्व स्वयंसेवक मोठ्या संख्येने आणि उत्साहाने या मोहिमेत सहभागी झाले होते.

## अशिव गणात भारतीय जनता पार्टीच्या समाधान कांबळेची प्रचारात मुसांडी

**दैनिक वादळ वार्ता**

**_औसा । प्रतिनिधी**

अशिव पंचायत समिती गटातून भारतीय जनता पार्टीचे समाधान कांबळे यांनी शेकडो कार्यकर्त्यांना सोबत घेऊन प्रचाराची रणधुमाळी सुरू करीत पदयात्रा आणि मतदारांच्या गाठीभेटीवर भर दिला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आ.अभिमान्यू पवार यांच्या आशीर्वादाने समाधान कांबळे यांच्यासारख्या तरुणांला संधी मिळाली असून त्यांच्या आई माजी सरपंच कोडांबाई कांबळे यांनी या भागात निवडणूक लढवली होती.थोड्या मताधिक्याने पराभव झाला असला तरी परिसरात ओळख टिकवून आहेत.अशिव सर्कल मध्ये औसा मतदार विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिमान्यू पवार यांच्या विकास निधीतून या गटात कोट्यावधी रुपयाचा निधी आल्यामुळे अनेक गावांमध्ये सामाजिक सभागृह, रस्ते व अत्यावश्यक कामे मार्गे लागले आहेत. या परिसरातील अनेक गावातील शेतकऱ्यांना शासकीय योजनांची माहिती देत फळबाग लागवड, पशुधनाचे गोठे, शेतकऱ्यांना सिंचन विहिरी, घरकुल योजनेतून देण्यात येणारा लाभ शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी दिलेले प्रोत्साहन यामुळे भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार पंचायत समितीचे उमेदवार समाधान कांबळे यांना लाभ होणार आहे. नाला सरळीकरण व खोलीकरण रुंदीकरणामुळे पाणी पातळीत वाढ झाली असून या परिसरात उसाचे क्षेत्र ही मोठ्या प्रमाणात घेण्याचा शेतकऱ्यांना उपयोग होत आहे. अशिव गटातील बेलकुंड ,गुळखेडा,तावशी काजळे चिंचोली, अशिव तांडा,अशिव,गुळखेडावाडी इत्यादी गावातून त्यांनी प्रचाराची फेरी पूर्ण केली असून निवडणूक चिन्ह कमळ घराघरात पोहोचविले आहे.अशिव गटातील प्रत्येक गावागावातून त्यांच्या उमेदवारीचे स्वागत होत असून त्यांच्या विजयासाठी माजी आमदार दिनकर माने,माजी जि प सदस्य राजेंद्र माने,विद्यमान सरपंच विष्णू कोळी, कोमलताई वळके, रमाबाई कांबळे, विनोद माने अनेक गावांतील प्रतिष्ठीत नागरिक भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते यांच्यासह अनेक प्रयत्नशील असून समाधान कांबळे यांची प्रचाराची जोरदार रंणधुमाळी गणात सुरू आहे

## मा.आ.संगीताताई ठोंबरे यांची शिवसेना उपनेत्या पदावर निवड झाल्या बद्दल भाऊसाहेब घोडके यांनी केला सत्कार

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदार संघाच्या माजी आमदार सौ.संगीताताई ठोंबरे यांनी नुकताच शिवसेना शिंदे पक्षात शिवसेना पक्षप्रमुख उप मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश केला होता.त्यांना शिवसेना पक्षाच्या उपनेते पदावर निवड करण्यात आली आहे.त्या निमित्ताने संत रविदास विश्व महापीठाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव,भारतीय नरेंद्र भाई मोदी संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष,राष्ट्रीयसदस्य,योगी आखाडा दिल्ली, राष्ट्रीय मंत्री गोरक्षक सेना, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बेटी बचाव बेटी पढाओ फाउंडेशन,तथा बीड



जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार संघ बीड यांनी सत्कार केला आहे. यावेळी भारतीय जनता मजदुर संघाचे महाराष्ट्र राज्य सचिव धनंजय कुलकर्णी,वडार समाज बीड जिल्हाध्यक्ष सतीश पवार,भारतीय जनता मजदुर संघाचे मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील, शंकर ठोंबरे,अनील पाखरे,सतीश डांगे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.यावेळी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.







# संपादकीय

## सुनेत्रा पर्वाचे संकेत

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचे मोठे आव्हान राष्ट्रवादीपुढे उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवारांचा राजकीय वारसा, पक्षाचे भवितव्य आणि सुनेत्रा पवार यांच्या भूमिकेकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यावर महाराष्ट्राचा कानाकोपरा खऱ्या अर्थाने शोकाकुल झाल्याचे मागील तीन दिवसांत पाहावयास मिळाले. अजित पवार यांच्या जाण्याने पवार कुटुंबीयांची, राष्ट्रवादी पक्षाची, बारामतीकरांची जितकी हानी झाली, त्याहून अधिक हानी अजित पवारांवर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची व महाराष्ट्रातील जनतेची झाली आहे. स्पष्टवक्तेपणा, रोखठोक विचार मांडणारा एक राजकारणी महाराष्ट्राने गमविला. मराठीतील नावाजलेले कवी भा. रा. तांबे यांनी त्यांच्या कवितेत म्हटलेच आहे की, रामकृष्णही आले-गेले, त्याविण जग का ओसचि पडले. काळ हा सुरूच राहतो, वेळ कधीही, कोणासाठी थांबत नाही. अजित पवारांच्या अकाली जाण्याने पार्थ, जय व सुनेत्रा पवार तसेच अन्य पवार कुटुंबीयांचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. संघटना पोरकी झाली आहे. संघटना अधिक काळ निर्णायकी ठेवून चालत नाही. दु:ख बाजूला ठेवून निर्णय घ्यावेच लागतात. मासा पाण्यात रडतो, त्याचे अश्रू कधीही कोणाला दिसत नाहीत. तशीच अवस्था आज अजित पवारांवर प्रेम करणाऱ्या सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ व राष्ट्रवादीच्या अन्य नेत्यांची व मंत्र्यांची झालेली आहे. महाराष्ट्र राज्याचे तब्बल ६ वेळा अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपद भूषविले आहे. राज्याचा ११ वेळा अर्थसंकल्प अजितदादांनी मांडला आहे. अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्राचे एक उपमुख्यमंत्रीपद रिक्त झाले आहे. राज्याला नव्याने अर्थमंत्री शोधावा लागणार आहे. राज्याला उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तर राष्ट्रवादी पक्षाला संघटना सांभाळणारे नेतृत्व हवे. अजित पवारांच्या जाण्याने पवार कुटुंबीय शोकाकुल असले तरी उपमुख्यमंत्री व पक्षाचे प्रमुखपद रिक्त ठेवणे परवडणारे नसल्याने राष्ट्रवादीच्या पहिल्या फळीतील नेतेमंडळींनी धावपळ सुरू केली आहे आणि ते करणे गरजेचे होते. अजित पवारांची व शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याची चर्चा गेल्या दोन-अडीच महिन्यांपासून सुरू आहे. अजित पवारांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता आणि शरद पवारांनीही त्यास संमती दिली होती. विलीनीकरणावर शिक्कामोर्तब होण्याची घटिका समीप आली आणि काळाने अजितदादांवर झडप घालून त्यांना हिरावून नेले. अजितदादांचे वारस म्हणून त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळावी आणि पार्थ पवारांना राज्यसभेवर पाठवावे, असा सूर आता राष्ट्रवादीच्या खासदार, आमदार, मंत्री, पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून आळविला जात आहे. शरद पवारांचे बोट धरून राजकारणात आलेल्या अजित पवारांनी काही कारणास्तव काकांपासून वेगळे होत आपली स्वतंत्र राजकीय चूल मांडली होती. अजित पवारांच्या पाठीशी स्वतंत्र जनाधार असल्याने विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार मोठ्या संख्येने निवडून आले होते. अजित पवारांच्या तसेच शरद पवारांच्या दोन्ही राष्ट्रवादीमधील प्रत्येकाचीच नव्हे तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यावेत, काका-पुतणे पुन्हा एकाच राजकीय व्यासपीठावर एकत्रित दिसावेत अशी महाराष्ट्रीय जनतेचीही इच्छा आहे.सुनेत्रा पवार या लोकसभा निवडणुकीनंतर राजकीय व्यासपीठावर सक्रिय झाल्या असल्या तरी गेली अनेक दशके त्यांनी अजित पवारांच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात पडद्याआडून साथ दिलेली आहे. लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळेंविरोधात पराभूत झाल्यावर अजित पवारांनी त्यांना राज्यसभेवर खासदार बनविले. एप्रिल २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये रायगड मतदारसंघातून राष्ट्रवादीकडून पार्थ पवार निवडणूक लढवित असताना सुनेत्रा पवारांनी पडद्याआडून बऱ्यापैकी धुरा सांभाळल्याचे राष्ट्रवादीमधील घटकांकडून सांगण्यात येत आहे. अजित पवारांनी सार्वजनिक कार्यक्रमातून भाषण करताना अनेकदा सुनेत्रा पवारांचे आभारही मानले. सुनेत्रा पवारांनी घर सांभाळल्याने मला महाराष्ट्र सांभाळता आला असल्याचे, राजकारणासाठी तसेच लोकांसाठी वेळ देता आला असल्याचे सांगत त्यांच्याप्रती कृतज्ञताही व्यक्त केली होती. बारामतीमधील अनेक कार्यक्रमांमध्ये अजित पवारांसोबत सुनेत्रा पवारांची उपस्थिती असायची. अजित पवारांनी स्वत:ची स्वतंत्र राजकीय चूल मांडल्यावर सुनेत्रा पवार यांचा राजकीय ठिकाणी वावर वाढण्यास सुरुवात झाली. आज अजित पवारांच्या जाण्याने पवार कुटुंबीय, राष्ट्रवादी संघटना, सरकारमधील अजित पवारांचे सहकारी या सर्वांना सांभाळण्याची जबाबदारी सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार या परिवारावर आलेली आहे. नजीकच्या काळात राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाल्यावर शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील, रोहित पवार आदी मंडळी मदतीला येतीलच. अजित पवारांच्या जाण्याने रिक्त झालेल्या उपमुख्यमंत्रीपदावर सुनेत्रा पवारांनी बसावे अशी इच्छा राष्ट्रवादीमधील कार्यकर्त्यांकडून व पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे, अनेक आमदारांकडूनही तशी भावना उघडपणे व्यक्त केली जात आहे. तीन दिवसांचा दु:खवटा सुरू असल्याने राष्ट्रवादीमधील घटकांनी याबाबत सुनेत्रा पवार, पार्थ पवार व जय पवार यांच्याशी चर्चा केली नसली तरी लवकरच ते चर्चा करतील व निर्णय घेतील. अजित पवारांच्या जाण्याने दु:ख भरून येणार नसले तरी राष्ट्रवादी संघटनेसाठी, आमदारांसाठी, कार्यकर्त्यांसाठी त्यांना डोळ्यांतील अश्रू पुसून लवकरात लवकर सक्रिय व्हावे लागणार आहे. सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, नीलेश लंके आदी अनेक मंडळी सुनेत्रा पवारांच्या मदतीला असणारच. पार्थ पवार, जय पवार यांनी राष्ट्रवादीच्या तळागाळातील कार्यकर्त्यांशी संपर्क करावाच लागणार आहे. अडचणीच्या काळात अजितदादांचा परिवार स्वत:चे आभाळाएवढे दु:ख बाजूला सारुन पक्षासाठी, कार्यकर्त्यांसाठी सक्रिय झाला आहे, हे चित्र लवकरात लवकर निर्माण होणे राष्ट्रवादीसाठी आवश्यक आहे. सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्रीपदी विराजमान करण्यासाठी राष्ट्रवादीकडून हालचाली सुरु झाल्या आहेत. महाराष्ट्रातील शोकाकुल जनतेचीही ती इच्छा आहे. त्यामुळे लवकरच सुनेत्रा पवारांचा शपथविधी होवून अजित पवारांनंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातून त्यांना निवडून यावे लागेल. महाराष्ट्राच्या राजकीय सारीपटावर सुनेत्रा पर्वाचा शुभारंभ झाल्याचे पहावयास मिळणार आहे.

# प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यान मालेचे २ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी रोजी आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यान माला २०२६ चे आयोजन वनस्पतीशास्त्र विभाग बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज जिल्हा बीड व श्रीमती केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर महाविद्यालय बीड,शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब जिल्हा धाराशिव व कै. शंकरराव गुट्टे ग्रामीण कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धर्मापुरी, तालुका परळी तसेच वसंतदादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाटोदा जिल्हा बीड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रोफेसर विजय कोठेकर जीव विज्ञान शास्त्रातील व्याख्यानमाले चे आयोजन करण्यात येत आहे. या व्याख्यानमालेचे हे सलग तिसरे शैक्षणिक वर्ष आहे.विज्ञानशाखेतील विद्यार्थी,प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी या सर्वांसाठी विज्ञानामधील नवनवीन संशोधन व मूलभूत संशोधन या विषयीचे अधिक माहिती होण्यासाठी या विज्ञान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत आहे.शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षांमध्ये दिनांक २ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधी दरम्यान या व्याख्यानमालेचे आभासी पद्धतीने आयोजन करण्यात आलेले आहे. प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यान माला २०२६ चे उद्घाटन दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता डॉ.सरस मॅडम, दयानंद अँग्लो वैदिक पदवीत्तर महाविद्यालय कानपूर उत्तरप्रदेश या करणार आहेत.या सहा दिवसीय आभासी व्याख्यानमाले मध्ये विज्ञान विषयक नवनवीन संशोधनासंबंधी विज्ञान क्षेत्रातील उच्चशिक्षित मार्गदर्शकाचे मार्गदर्शन लाभणार आहे.प्रथम सत्राचे मार्गदर्शक प्रा.डॉ. इंद्राणी पाल,जैव तंत्रज्ञान विभाग,ब्रेनवेअरविद्यापीठ,कोलकत्ता पश्चिम बंगाल या मार्गदर्शन करणार आहेत.द्वितीय सत्राचे मार्गदर्शक प्रा.डॉ.शरद कांबळे वनस्पतीशास्त्र विभाग,मराठा विद्या प्रसारक समाज मंडळाचे, विज्ञान महाविद्यालय नाशिक.तृतीय सत्राचे मार्गदर्शक प्रा.डॉ. हितेशकुमार सोळंकी, विभागप्रमुख वनस्पती शास्त्र विभाग,गुजरात विद्यापीठ,अहमदाबाद. चौथ्या सत्राचे मार्गदर्शक डॉ.किरण जाधव,प्रमुख शेतीविषयक विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषीविद्यापीठ परभणी,चतुर्थ सत्राचे व्याख्याते प्रा.डॉ.देबश्री काकती,वनस्पतीशास्त्र विभाग,मंगलदायी महाविद्यालय,दरंग, आसाम व सहाव्या सत्राचे मार्गदर्शक प्रोफेसर डॉ. नितीन लभाने,वनस्पती शास्त्र विभाग,भवन विज्ञान महाविद्यालय, अंधेरी मुंबई हे असणार आहेत.विज्ञानामधील नवसंशोधनावर आधारित या व्याख्यानमालेमध्ये विद्यार्थी व संशोधन मार्गदर्शक यांच्यामध्ये विचारांची, संशोधनाची देवाण-घेवाण व्हावी विद्यार्थी संशोधकांना विज्ञानामधील नवीन प्रवाह व त्यामधील संधी याची ओळख व माहिती व्हावी या अनुषंगाने या विज्ञानविषयक व्याख्यान मालेचे आयोजनकरण्यात येत आहे.प्रोफेसर विजय कोठेकर ज्ञानविज्ञान व्याख्यानमाला २०२६च्या यशस्वीतेसाठी महा विद्यालय व विद्यापीठा तील विज्ञान विषयाच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी,संशोधकांनी व प्राध्यापकांनी यामध्ये आभाशी पद्धतीने सहभागी होऊन आपले विज्ञान विषयक ज्ञान वृद्धिंगत करावे असे आवाहन मुख्य संयोजक प्रोफेसर डॉ.नवनाथ काशीद,वनस्पतीशास्त्र विभाग,बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज जिल्हा बीड यांनी केले आहे.या विज्ञान विषयक सहादिवशीय व्याख्यानमालेच्या आयोजनास श्री.छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडसचे सचिव श्री. रमेशरावजी आडसकर साहेब,संस्थेच्या तज्ञ संचालक सौ.अर्चनाताई आडसकर,महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव फावडे,या व्याख्यान मालेमध्ये सहभागी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर बीड,डॉ. ताराचंद होळंबे धर्मापुरी, डॉ.हेमंत भगवान कळंब व डॉ.बळीराम राख पाटोदा यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# देव देश आणि धर्म व लोकांच्या न्यायासाठी सातत्याने शासन प्रशासन दरबारी आवाज उठून सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देणारे असे बीड नगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक तथा ॲड.गोविंद शिराळे पाटील यांना लोक रत्न पुरस्काराने केले सन्मानित

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा सत्र न्यायालयातील सुप्रसिद्ध ड .तथा देव देश धर्म या साठी सातत्याने लढणारे व लोकांना न्याय मिळवून देणारे मग शहरांमधील नागरिकांना असो किंवा बीड तालुक्यातील त्यांच्या संपर्कात असणाऱ्या लोकांना तसेच बीड जिल्ह्यातील त्यांच्या संपर्कातील लोकांना शासन प्रशासन तसेच न्यायालयाच्या माध्यमातून न्याय मिळवून देणारे असे बीड नगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक तथा ड.गोविंद शिरोळे पाटील यांच्या उत्कृष्ट कामाच्या बाबतीत लोकशाही पत्रकार संघ व श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन च्या वतीने समाधान व्यक्त करून त्यांना लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले हा लोकरत्न पुरस्कार महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तथा श्री सोमेश्वर हनुमान महादेव मंदिर फाउंडेशनचे मा श्री अध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांच्या आदेशावरून महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे सर्वे सर्वा मा श्री संस्थापक अध्यक्ष साहेब व लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सौ सुनंदाताई केदार लेडी सिंघम यांच्या हस्ते व प्रमुख प्रशासकीय मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार देऊन



नगरसेवक तथा ड. गोविंद शिराळे पाटील यांना सन्मानित करण्यात आले यावेळी येथे उपस्थित असलेले लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम जी वावळकर सर तसेच बीड जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर साहेब तसेच त्यांचे सहकारी मुंडे साहेब शिंदे साहेब गाडे साहेब व लेडी सिंघम वाहतूक शाखेच्या शेख मॅडम तसेच लोकशाही पत्रकार संघाचे जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर प्रकाश गाडे पत्रकार किशोर कुलकर्णी लोक लाडक्या बियांचे बाजीराव ढाकणे साहेब तसेच पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी व बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते तेव्हा लोक रत्न पुरस्कार सोहळा मोठ्या आनंदामध्ये आणि थाटामाटा मध्ये संपन्न झाला एडवोकेट गोविंद शिराळे पाटील बीडचे स्वीकृत नगरपालिकेचे नगरसेवक यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील उत्कृष्ट कार्यास सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा देण्यात आल्या

तत्पूर्वी एडवोकेट तथा बीड नगर परिषदेचे श्रीकृत नगरसेवक मा श्री गोविंद शिराळे पाटील यांनी लोक रत्न पुरस्कार स्वीकार केल्यानंतर त्यांनी थोडक्यात आपले मनोगत या लोकरत्न सत्कार सोहळ्याप्रसंगी उपस्थित असलेले नागरिकांच्या समोर व्यक्त केले की मी बीड शहरातील प्रत्येक प्रभागांमध्ये जाऊन प्रत्येक नागरिकांच्या नगरपालिकेच्या माध्यमातून काय समस्या आहेत त्या जाणून घेऊन सोडवण्यासाठी बीड नगर पालिकेकडे मी प्रयत्नशील राहील व जे गोरगरीब लोक असतील ज्यांना कोर्ट केसेस साठी लढण्यासाठी आर्थिक बाब ज्यांची कमी आहे अशांसाठी आपण मोफत कोर्टामध्ये केस चालवून त्यांना मा न्यायालयाच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न करू असे यावेळी उत्कृष्ट अभ्यासपूर्वक आपले मनोगत एडवोकेट तथा बीड नगरपरिषद चे स्वीकृत नगरसेवक ड.गोविंद शिरोळे पाटील यांनी आपले विचार थोडक्यात व्यक्त केले यावेळी उपस्थित असणाऱ्या सर्व नागरिकांनी टाळ्यांचा कडकडाट केला व त्यांच्या या उत्कृष्ट अभ्यासपूर्वक विचाराचे कौतुक केले व पुढील कार्यास सर्वांनी मनस्वी त्यांना शुभेच्छा दिल्या व नंतर

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आत्माराम जी वावळकर साहेब कार्याध्यक्ष लोकशाही पत्रकार संघ यांनी केले व हा कार्यक्रम बीड या ठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाला .

# शेतकऱ्याचा खरा डिजिटल साथी-महाविस्तार-AI ॲप परळी तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी ॲप डाउनलोड करण्याचे आवाहन-दाऊतपुरचे सरपंच श्रीकांत (कांता) फड

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी वैजनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक शाश्वत, नफा व सुरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने विकसित केलेले महाविस्तार-एआय मोबाईल ॲप हे शेतकऱ्यांसाठी एक विश्वासार्ह डिजिटल साथी ठरत आहे. या पार्श्वभूमीवर दाऊतपुर गावाचे सरपंच श्री. श्रीकांत (कांता) फड यांनी परळी तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना महाविस्तार-एआय प त्वरित डाउनलोड करून वापरण्याचे आवाहन केले आहे.आजची शेती हवामान बदल, वाढता उत्पादन खर्च, कीड-रोगांचा प्रादुर्भाव आणि बाजारातील चढ-उतार यामुळे मोठ्या आव्हानांना सामोरी जात आहे. अशा परिस्थितीत महाविस्तार-एआय ॲप शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक, सल्लागार आणि मित्राची भूमिका बजावत आहे. पेरणीपूर्व नियोजनापासून काढणी व काढणीनंतरच्या साठवणूक तंत्रज्ञानापर्यंत सर्व माहिती एकाच पमध्ये उपलब्ध करून देणे हे या पचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.या पद्वारे शेतकऱ्यांना रिअल-टाइम हवामान अंदाज, पर्जन्यमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग यासह हवामानावर आधारित पीक सल्ला मिळतो. तसेच मृदा आरोग्य पत्रिका, खत मात्रा गणक, योग्य खतांचे नियोजन व वेळापत्रक, पाणी व्यवस्थापन व स्मार्ट सिंचन याबाबत अचूक माहिती उपलब्ध होते. कीड व रोग ओळख, त्यावरील उपाययोजना, तणनाशकांची माहिती यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन पीक संरक्षण अधिक प्रभावी होते. महाविस्तार-एआय पमधील एआय उहरींलों ही एक अत्याधुनिक सुविधा असून शेतकरी कोणताही शेतीविषयक प्रश्न विचारू शकतात आणि त्यांना त्वरित, स्थानिक परिस्थितीनुसार तज्ज्ञ मार्गदर्शन मिळते. याशिवाय बाजारभावाची अद्ययावत माहिती, पीक विमा योजना, कृषीविषयक विविध शासन योजना, महाडिबीटी व नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत अर्ज करण्याची सुविधाही या पमध्ये उपलब्ध आहे.शेतकऱ्यांना माहितीपूर्ण व्हिडिओ, शेतीशाळा, हवामान-अनुकूल तंत्रज्ञान, ड्रोन तंत्रज्ञान, नवीन



स्टार्टअप व संशोधन यांची माहिती मिळून शेती अधिक आधुनिक व नफेखोर बनवण्यास मदत होते. ज्ञानाचा साथी - शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात उतरवणारे हे प शेतकऱ्यांचा खरा डिजिटल मित्र ठरत आहे. महाविस्तार-एआय ॲप वापरण्यासाठी गूगल प्ले स्टोर वरून 'महाविस्तर एआय ' प डाउनलोड करावे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील मंडळ कृषी अधिकारी, अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, महाविस्तार-ए आय : शेतकऱ्यांचा खरा डिजिटल साथी, परळी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी एकाच पमध्ये संपूर्ण शेती माहिती, पेरणीपासून काढणीपर्यंत एआय तंत्रज्ञानातून तज्ज्ञ मार्गदर्शन, महाविस्तार-एआय पमुळे उत्पादन वाढ व खर्चात बचत होणार आहे. तसेच हवामान, पीक सल्ला, कीड-रोग नियंत्रण व बाजारभाव - सर्व माहिती एकाच पमध्ये, एआय उहरींलों द्वारे त्वरित, स्थानिक आणि अचूक शेती मार्गदर्शन, मृदा आरोग्य पत्रिका, खत मात्रा गणक व पाणी व्यवस्थापनाची सुविधा, शासन योजना, पीक विमा, महाडिबीटी अर्ज व डिजिटल सेवा एका क्लिकवर मिळविण्यासाठी परळी वैजनाथ तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवानी शेतकऱ्याचा खरा डिजिटल साथी - महाविस्तार-एआय प डाउनलोड करण्याचे आवाहन दाऊतपुरचे सरपंच श्रीकांत (कांता) फड यांनी केले आहे.

# कर्जतमध्ये खुलेआम होत आहे डोंगर उत्खनन महसूल व पोलीस विभागाचा आशिर्वाद?

**दैनिक वादळ वार्ता**
**कर्जत । प्रतिनिधी**

कर्जत शहरात आणि राष्ट्रीय व राज्य मार्गालगत भिसेगाव डोंगर परिसरात रात्रीपासून ते पहाटे पर्यंत कर्जत तहसील कार्यालयातील महसूल विभागाच्या आशिर्वादाने मोठ्या प्रमाणात डोंगर उत्खनन करण्याचे काम जोरात सुरू आहे. त्यात विद्युत टॉवर मोठ्या प्रमाणात असून टॉवरच्या आजूबाजूचे खोदकाम जेसीबीच्या सहाय्याने केले जात आहे. जर टॉवरचा समतोल ढासळला तर मोठी जीवित हानी होऊ शकते. या हानिकारकला जबाबदार कोण असणार ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सध्या कर्जतमध्ये किरकोळ महसूल रक्कम भरून ढीगभर उत्खनन केले जात आहे. मात्र रॉयल्टी किती भरली आणि प्रत्येक्षात किती खोदकाम केले जाते याकडे महसूल विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. याबाबत तक्रारी अर्ज अथवा आवाज उठविल्यास बघतो, सांगतो मग कारवाई करतो असे न पटणारे उत्तर देऊन अधिकारी जबाबदारी झटकावीत आहे. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षणामुळे डोंगर उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरू आहे.याकडे कर्जत तहसीलदार धनंजय जाधव यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे बोलले जात आहे. कधी तरी उत्खननावर कारवाई होत आहे, पण ती अपुरी आहे; महसूल, वन आणि गौण खनिज विभाग यात सामील असल्याच्या तक्रारी आहेत, त्यामुळे अधिकारी कारवाई कधी करतील हे निश्चित सांगता येत नाही, पण नागरिकांच्या तक्रारी, आंदोलने आणि राजकीय दबावामुळे कारवाईची मागणी जोर धरत आहे आणि काही ठिकाणी महसूल विभागाने दंड आकारले आहेत, पण माफियांकडून महसुली नुकसान होत असल्याने, यावर कठोर आणि एकत्रित कारवाई होणे आवश्यक आहे, त्यात अनेक वेळा उत्खनन करणारे पक्षाचे कार्यकर्ते तर कधी पदाधिकारी असतात त्यामुळे नेतेमंडळींच्या दबावामुळे कारवाई होत नाही काही ठिकाणी गौण खनिज, ब्लास्ट, डोंगर रात्री अपरात्री पोखरणे हे सरपंच पोलीस पाटील हे देखील मोठ्या प्रमाणात करतात याबाबत उपविभागीय अधिकारी , तहसीलदार आणि पोलीस ठाण्यात लेखी तक्रार देऊनही कारवाई करण्याकडे दिरंगाई केली जात आहे. त्यामुळे कर्जत मधील आणि डोंगर जमीन दोस्त करण्यामध्ये पक्षाचेच नेतेमंडळी कारणीभूत आहे. त्याचप्रमाणे रात्री बे रात्री डंपर ट्रकच्या माध्यमातून अवैध वाळू, माती, रेती, खडी सारखे वाहून नेण्याचे काम पोलिसांच्या आणि महसूल विभागाच्या नजरे आड काम होत आहे. मात्र तलाठी ,मंडळ अधिकारी, महसूल आर्थिक साटेलोटे असल्याने संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे. याबाबत महसूल विभागाचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या गोष्टीला दुजोरा दिला आहे.

# भाजपाला सत्तेचा अहंकार,राजकीय स्वार्थासाठी जाती धर्मात तेढ निर्माण करण्याचे काम-हर्षवर्धन सपकाळ

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रचार सभांचा धडाका

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज या भारतीय जनता पक्ष हा सत्तेसाठी जाती धर्मात भांडणे लावून स्वतःचा राजकीय स्वार्थ साधत आहे.आज केवळ हिंदू मुस्लीम असा धार्मिक वाद निर्माण करण्यापर्यंतच ते थांबले नाहीत तर मराठा-ओबीसी, आदिवासी, दलित समाजातही भांडणे लावून महाराष्ट्रातील सामाजिक सलोख्याचे आज वातावरण बिघडवण्याचे पाप भाजपाने केले आहे, अशी टीका करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या भाजपाला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत धडा शिकवा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लाडसावंगी, गणोरी, बाजार सावंगी व नागव या ठिकाणी जिल्हा परिषद व पंचायत समिती या सर्व



निवडणुकांसाठी प्रचारसभा घेतल्या. यावेळी जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, छत्रपती संभाजी नगर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर , प्रदेश सचिव सुदामराव मते, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख जगन्नाथराव पवार, फुलंब्रीचे नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे तसेच स्थानिकांनी पदाधिकारीही, कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.आज यावेळी भाजपा सरकारचा समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भारतीय जनता पक्षाला देशातील लोकशाही, संविधान संपवायचे आहे. एक देश व एक पक्ष ठेवायचा आहे, त्यामुळे विरोधी पक्षाला संपवण्याचे काम ते करत आहेत. निवडणुकीत पैसा फेक तमाशा देख, हे वगनाट्य जोरात सुरु असून पोलीसांच्या मदतीने विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमक्या दिल्या जातात, निवडणूक आयोगही सत्ताधारी पक्षासाठीच काम करत आहे. या परिस्थितीतही काँग्रेस पक्ष जनतेच्या प्रश्नासाठी, लोकशाही व संविधान अबाधित ठेवण्यासाठी लढत आहे. नगरपालिका व महानगरपालिका निवडणुकांमध्ये जनतेने काँग्रेसला चांगला कौल दिला आहे. आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्येही काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन सपकाळ यांनी केले आहे.भाजपाला शेतकरी, महिला, कामगार, तरुणांचे प्रश्न दिसत नाहीत. शेतकरी आत्महत्या करत आहे, शेतमालाला भाव मिळत नाही, नोकरी नाही म्हणून गावोगावी तरुण चिंतेत आहेत. महागाई प्रचंड वाढली आहे पण भाजपा सरकार मात्र त्याकडे लक्ष न देता सामाजिक तेढ निर्माण करण्याच्या मुद्द्यांना ऐरणीवर आणून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहे. भारतीय जनता पक्षाचा हा डाव ओळखा, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले..

# पैठणच्या विकासाला अजित दादांचा हातभार तालुक्यात हळहळ



दैनिक वादळ वार्ता

**पाचोड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वे सर्वा अजित दादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची बातमी पैठण शहरासह तालुक्यात पसरतात संपूर्ण तालुका शोकाकुल झाला होता तालुक्यातील व्यापाऱ्यांनी दिवसभर दुकाने बंद ठेवून दादांना सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार सुरू असताना बातमी कळताच सर्व पक्षातील उमेदवारांनी तात्काळ प्रचार थांबवून दादांना श्रद्धांजली अर्पण केली. अजित पवार यांचे पैठण तालुक्यावर विशेष प्रेम होते. पैठण आपेगाव विकास प्राधिकरणाला ३०० कोटी रुपये निधी मंजूर केला होता या निधीच्या माध्यमातून पैठण शहर व आपेगाव चा कायापालट झाला गोदावरी नदीवरील जायकवाडी ते आपेगाव बंधारा आपेगाव ते हिरड पुरी बंधाऱ्याला मजुरी व निधी देऊन पूर्ण केला.आज रोजी या दोन्ही बंधाऱ्यांमुळे हजारो हेक्टर शेती सिंचनाचा प्रश्न मार्गी लागला लोकनेता म्हणून शेतकऱ्यांचा कैवारी म्हणून अजितदादा पवार यांची पैठण तालुक्यात ओळख झाली होती.बुधवारी सकाळी विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते अजित दादा पवार यांचे निधन झाले ते वृत्त तालुक्यात पसरतात संपूर्ण तालुका सुन्न झाला पैठण तालुक्यातील पैठण शहर बिडकीन विहामांडवा आढळून पाचोड जिल्हा परिषद गटातील व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने स्वयं स्फूर्तीने बंद ठेवून दादांना भावपूर्ण श्रद्धांजली

# हणेगावात ज्वेलर्स दुकान फोडण्याचा चोरट्यांचा प्रयत्न फसला मरखेल पोलिसांनी घेतला साडेसात लाखाचा मुद्देमाल ताब्यात





दैनिक वादळ वार्ता

**हाणेगाव । प्रतिनिधी**

हणेगाव बसस्थानक परिसरातील आच्यारे ज्वेलर्स या दुकानात मध्यरात्री चोरी करण्याचा प्रयत्न मरखेल पोलिसांच्या सतर्कतेमुळे फसला. या प्रकरणी पोलिसांनी एका चोरट्यास ताब्यात घेतले असून दोन चोरटे फरार झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार,दिनांक ३१ शनिवार रोजी तीन चोरट्यांनी आच्यारे ज्वेलर्सचे शटर तोडून दुकानात प्रवेश केला दुकानातील सीसीटीव्हि कॅमेरे वर काळा स्प्रे मारण्यात आले दुकानात शिरले त्यांनी दुकानातील गल्ला फोडून सोने चांदी व रोख रक्कम पिशवीत भरून पळ काढण्याचा प्रयत्न करत असताना.. रात्रगस्त घालत असताना मरखेल पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विलास पवार यांनी हणेगाव बसस्थानक पासून रात्रगस्त घालत असताना आच्यारें ज्वेलर्स दुकानाचे शटर उघडे दिसले. पोलिसांची चाहूल लागताच चोरट्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी पाठलाग केला व सेवकसिंग रघुविरसिंग तिलपले वय २२ वर्ष राहणार हनुमानगल्ली ता.उमरी यास ताब्यात घेतले, तर सद्दाम वय २७ व सोहेल वय २५ वर्ष राहणार ता.उमरी हे दोन पसार झाले ..

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीकडून सोने चांदी सह रोख रक्कम ३० हजार ७९० रुपये असे एकूण ७ लाख ४५ हजार ७९० रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी दुकानमालक अमित राजकुमार आच्यारे यांना संपर्क करून बोलावले. त्यानंतर आरोपीला मरखेल पोलीस ठाण्यात नेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अधिकारी विलास पवार करत आहेत..

# कारला गणात शिवसेनेची धगधगती मशाल पेटवणार,शिवदुत विलास व्यंकटराव काळे

दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील खरोसा जिल्हा परीषद गटातील कारला पंचायत समिती गणात विकासकामाच्या मुद्यावर व शेतकरी हित जोपासत विकासाची विचारधारा व निष्ठेच प्रतिक उराशी बाळगुन कारला गणात महाविकास आघाडीची धगधती मशाल पेटवणार असल्याच विलास काळे यांनी सांगीतले ,गेल्या विस वर्षापासुन सक्रीय राजकारणात कुटलाही राजकीय वारसा नसताना स्वकर्तत्वावर आपली राजकीय ओळख निर्मान करत , सलग पंधरा वर्षापासुन कारला ग्रामपंचायत सदस्य मनुन कारला गावच्या जनतेची केलेली सेवा व एक ग्रामपंचायत सदस्य ते श्री संत शिरोमनी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना संचालक सह तालुक्यात अनेक पद भुषवित बाळासाहेबांचा कडवट शिवसैनिक मनुन नावलौकीक असलेले निष्ठावंत शिवसैनिक विलास व्यंकटराव काळे यांना प्रचारा दरम्यान जनतेतुन भरभरुन प्रतिसाद मीळत असल्याने ,गेल्या विस वर्षापासुन सक्रीय राजकारण करत असताना कुटलाही भेदभाव न ठेवता सर्वसामान्याच्या हाकेला धाउनू येणारा आपला हक्काचा मानुस मनुन कामे केल्याने काम केल्याने व खरोसा जिल्हा परीषद गटातील सर्वसामान्य शेतकर्या उस वेळेवर घेउन गेल्याने कारला पंचायत समिती गणात विलास व्यंकटराव काळे यांच्या मशाल चिन्हाचाच बोलबाला दिसुन येत आहे ,श्री संत शिरोमनी मारुती महाराज कारखान्याच्या माद्यमातुन सर्वसामान्य शेतकर्यांचा उस कारखान्याला घेउन जात शेतकर्यांना आधार देण्याच काम विलास काळे यांनी केल आहे ,आज पहायला गेल तर कारला ,कुमठा ,पारधेवाडी ,

येळवट ,मोगरगा ,तांबरवाडी राजेवाडी ,व जावळी गावातील अनेक शेतकर्यांच्या उसाच्या बांधावर जाउन कारखान्याला उस घेउन गेल्याने शेतकरी बळीराजा आमच्या हक्काचा मानुस मनुन विलास काळे यांना प्रचारा दरम्यान आपला पाठिंबा दर्शवत असल्याच मतदारसंघातील गावोगावी दिसत आहे ,



# नायगाव तालुक्यातील गडगा येथे मुरूम माफियांचा धुडगूस;पथक नावालाच माफियांना मोकळे रान

दैनिक वादळ वार्ता

**नांदेड । हानुमंत चंदनकर**

नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यात गडगा येथे गौण खनिजांच्या नावाखाली सुरू असलेली मुरूम लूट ही आता व्यवस्थात्मक गुन्हा ठरत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. मुरूम उत्खननाच्या नावाखाली अख्खी माळराने पोखरली जात असताना माफियांचा उच्छाद सुरू असताना महसूल प्रशासन मात्र जाणूनबुजून डोळेझाक करत आहे का? असा सवाल नागरिक विचारत आहेत.नायगाव तालुक्यातील गडगा येथे माळरानातून नाममात्र रॉयल्टीच्या आधारे शासनाच्या मालकीच्या गौण खनिजांची खुलेआम चोरी सुरू आहे. कायद्याच्या चौकटीत परवानगी दाखवून प्रत्यक्षात नियमांना केराची टोपली दाखवली जात असून संपूर्ण डोंगरमाळराने खोल खड्ड्यांनी विदीर्ण झाली आहेत. यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून भविष्यातील पाणीटंचाई व भूधसरणीचा धोका निर्माण झाला आहे.

**रात्रंदिवस व भर दिवसा माफिया राज प्रशासन**

नायगाव तालुक्यातील ज्या पथकांकडून कारवाईची अपेक्षा आहे. तीच पथके नावालाच असल्याची चर्चा उघडपणे नागरिकांतून सुरू आहे. कारवाई शून्य गुन्हे नोंद नाहीत आणि महसूलचा कोट्यवधींचा बुडवडा मात्र सुरूच आहे. परिणामी माफियांना मोकळे रान मिळाले असून सामान्य नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. या गंभीर प्रकरणाकडे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी तातडीने लक्ष घालून स्वतंत्र चौकशी करावी व दोषी अधिकारीकर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करावी आणि अवैध गौण खनिज उत्खनन तात्काळ बंद करावे अशी मागणी नायगाव व गडगा येथील नागरिकांतून होत आहे. अन्यथा हा संताप उद्रेकाच्या दिशेने जात असल्याचा इशाराही दिला जात आहे.

**अर्थपूर्ण शांतता' की व्यवस्थेची भागीदारी**

गडगा येथे शासनाकडून नाममात्र १०० ब्रासची रॉयल्टी मंजूर असलेल्या गटाच्या अडून मोठ्या प्रमाणात हजारो ब्रास मुरूम चिटकून असणाऱ्या गायरान



सार्वजनिक जमिनीतील (बेकायदेशीर) उत्खन सुरू असल्याचा गंभीर बेकायदेशीर प्रकार सामोरे आला आहे. रॉयल्टी केवळ ०.८१ आर ठराविक क्षेत्रासाठी असताना प्रत्यक्षात मात्र गायरान जमिनीत उत्खन करून टिप्परच्या साह्याने मुरमाची अवैध वाहतूक केली जात आहे.या अवैध मुरूम उत्खनन प्रकरणात महसूल यंत्रणेची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अवैध मुरूम रोखण्यासाठी शासनाने पथके नियुक्त केली. असली तरी ही पथके मुरूम माफियांना मॅनेज असल्याप्रमाणे वागत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. त्यामुळे पथक आहे पण कारवाई नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे.

रात्रीच्या अंधारात व दिवसा गेल्या चार दिवसापासून सततअवैध मुरूम उपसा व वाहतूक जोरात सुरू आहे. राजकीय वरदहस्त असलेल्या फंटरचे टिप्पर रस्त्यांवरून सुसाट धावत असून कायदासुव्यवस्थेचा पूर्णपणे फज्जा उडवला जात आहे. विशेष म्हणजे ही अवैध मुरूम बिनधास्तपणे गडगा मार्गे नरसी कडे दिवसा व रात्री जात आहे. असे नायगाव तालुक्यातील नागरिकांतून मोठ्या प्रमाणात बोलल्या जात आहे सर्व प्रशासनाच्या नजरेआड कसे शक्य आहे? की आर्थिक देवाणघेवाणीपोटी महसूल यंत्रणेने मौन पत्करले आहे याचे उत्तर मात्र अनुत्तरीत आहे. मंडळ अधिकारी यांना दूरध्वनी येऊन संपर्क साधले असता माझा फोन रिसीव केलेला नाही व तसेच तलाठी चमकुरे यांना संपर्क साधला असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली व वेळ कडुपणा केला. या ठिकाणी दहा हवा दोन जेसीबी बिंदासपणे रात्री व भर दिवसा मुरमाच उत्खन मोठ्या प्रमाणात चालू असल्याचे दिसून आले आहे.

# केज नगर पंचायतीचा पंतप्रधान आवास योजनेत ३ कोटी ६२ लाखांचा महाघोटाळा

## गोरगरिबांच्या स्वप्नांवर पाणी,घरकुलचा निधी इतरत्र वळवला,सखोल चौकशी करावी

## नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड,हारुणभाई इनामदार यांची पत्रकार परिषदेत माहिती

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

केज नगर पंचायतीने पंतप्रधान आवास योजनेत लाखोंचा महाघोटाळा झाला असून गोरगरिबांच्या स्वप्नांवर पाणी फेरले आहे,घरकुल चा निधी बेकायदेशीरपणे इतरत्र वळवला असुन सखोल चौकशी करावी अशी मागणी नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, हारुणभाई इनामदार यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींचे 'प्रत्येकाला हक्काचे घर' हे स्वप्न केज नगरपंचायत मध्ये भ्रष्टाचाराच्या चिखलात रुतले आहे. नगरपंचायतीच्या सत्ताधाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी संगनमत करून पंतप्रधान आवास योजनेतील तब्बल ३कोटी ६२ लाख रुपयांवर डल्ला मारल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे,सामान्यांचा आवाज उठवणाऱ्या पत्रकारांनाही या भ्रष्ट साखळीने सोडले नसल्याने शहरात संतापाची लाट उसळली आहे.

**नेमका प्रकार काय आहे ?**

गोरगरीब जनतेच्या हक्काच्या पैशांवर सत्ताधाऱ्यांनी दरोडा टाकला आहे.हा पैसा लाभार्थींपर्यंत पोहोचण्या ऐवजी अधिकार आणि पदाचा गैरवापर करून हडप करण्यात आला आहे.गोरगरिबांच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्या या प्रवृत्तीमुळे केज शहराचे नाव राज्यात खराब होत असून, लाभार्थ्यांमध्ये मोठे नैराश्य पसरले आहे.

**पत्रकारांनाही बसला भ्रष्टाचाराचा फटका**

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांना देखील या भ्रष्ट कारभाराचा फटका बसला आहे.पत्रकार प्रकाश मुंडे आणि पत्रकार धनंजय कुलकर्णी यांना या भ्रष्टाचाराने थेट लक्ष्य केले आहे.पत्रकार प्रकाश एकनाथ मुंडे (लाभार्थी घर



क्र.२२७) मुंडे हे या योजनेचे पात्र लाभार्थी असतानाही,केज नगर पंचायतीने त्यांचे हक्काचे सर्व हप्ते संगनमत करून गिळंकृत केले आहेत.एका पत्रकाराच्या हक्काच्या घरावर जर ही दरोडेखोरी होत असेल,तर सामान्य जनतेचे काय?असा जळजळीत सवाल आता उपस्थित केला जात आहे.

**पंतप्रधानांना ही लावला 'चुना'!**

भ्रष्टाचाराची ही सीमा इतकी ओलांडली गेली आहे की,देशाच्या पंतप्रधानांच्या महत्त्वाकांक्षी योजनेलाच घरघर लागली आहे. मोदी है तो मुमकिन है असे म्हणत असताना, केजच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी चक्क मोदी यांनाच दिवसाढवळ्या चुना लावून मोकळे झाले आहेत.विद्यमान नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड व गटनेते हारुणभाई यांनी हा भ्रष्टाचार मागच्या लोकप्रतिनिधी व अधिकारी यांनी दि.२० मे २०१९ ते ३१ जानेवारी २०२२या कालावधीत संगनमताने झाला असून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असल्याचे सांगितले

**सत्ताधारी आणि प्रशासन सुस्त**


इतका मोठा घोटाळा उघडकीस येऊनही नगर पंचायतीचे सत्ताधारी आणि वरिष्ठ अधिकारी हात झटकून मोकळे होत आहेत.या गुन्हेगारांना पाठीशी कोण घालतंय? असा प्रश्न जनतेतून विचारला जात आहे.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात रंगभरण स्पर्धा व संत रविदास यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दि.१ फेबुवारी २०२६ रोजी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते, प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली रंगभरण स्पर्धा व संत रविदास जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.सर्वप्रथम संत रविदास यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.यावेळी संत रविदास एक निस्सीम भक्त या विषयावर परिसंवाद घेण्यात आला.





या परिसंवादात रामकृष्ण तात्या गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, नारायणभाऊ गायकवाड, रमेश आबा गायकवाड, दादासाहेब गायकवाड यांनी विचार मांडले. त्यानंतर विदयार्थी, विद्यार्थीनींसाठी रंगभरण स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.रंगभरण स्पर्धेत प्रथम - सोहम श्रीराम गायकवाड,द्वितीय - यशवंत हनुमंत सौदागर, तृतीय -शिवम हनुमंत गायकवाड,तज्ञ परिक्षक म्हणून रविंद्र गायकवाड पेन्टर यांनी काम पाहिले. हे विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र व बॉलपेन बक्षीस म्हणून देण्यात आले.बक्षीस वितरण व प्रमाणपत्र वितरण डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड, रविंद्र गायकवाड पेन्टर, रमेश आबा गायकवाड, नारायणभाऊ गायकवाड, सुधीर गायकवाड,ज्ञानोबा ओव्हाळ,बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.या रंग भरण स्पर्धेत वेदिका गायकवाड,श्रद्धा गायकवाड,शिवराज जाधव,आर्यन गायकवाड, वेदिका गायकवाड,अक्षरा सौदागर,यशवंत सौदागर, सुशांत सौदागर,शिवम गायकवाड,सोहम गायकवाड,बालाजी टिंगरे,सोहम गायकवाड, अनुजा घोगले यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला.विदयार्थांनी विविध स्पर्धेला सामोरे जाऊन स्वतः ला सिद्ध करावे असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.तसेच संत रविदास यांनी सामाजिक समतेचा संदेश दिला. माणूसकी ही जात आणि मानवता हा धर्म त्यांनी आयुष्यभर सांगीतले तसे ते वागले अन जगले व समस्त जगताला तशी शिकवण दिल्याचे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रविंद्र गायकवाड पेन्टर यांनी केले.तसेच सुत्रसंचालन बाबासाहेब गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन रामकृष्ण तात्या गायकवाड यांनी केले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी,युवक, वाचक,जेष्ठ नागरीक यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# श्री भगवान बालाजीच्या तिसावा वर्धापन दिनानिमित्त भाविकांकडून चांदीचा दरवाजा भगवंता चरणी अर्पण



**दैनिक वादळ वार्ता**

**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगांव नरसी येथील प्रसिद्ध व जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या श्री भगवान बालाजीच्या तिसावा वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आला होता पहाटे विधिवत पूजा अभिषेक आरती व व दुपारी महाप्रसाद भव्य महाप्रसादाचा आयोजन करण्यात आले होते यानिमित्ताने भाविकांकडून चांदीचा दरवाजा भगवान बालाजी चरणी समर्पित करण्यात आला श्री राजेश पाटील भिलवंडे बालाजी मंदिर समितीचे सचिव शंतनू कोटगिरे नंदू भाऊ गबाळे साईनाथ मेडेवार भागवत शेठ कोटगीरे यासह ने भाविकांकडून चांदीचा दरवाजा भगवंता चरणी समर्पित करण्यात आला होता. समर्पित करण्यात आला वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम भगवान बालाजी मंदिर नरसी येथे संपन्न होतात दर्शनासाठी आंध्रा तेलंगणा कर्नाटक महाराष्ट्रातून लाखो भाविक येत असतात भगवान बालाजी मंदिर वर्धापन दिनानिमित्त खास मंदिरांना फुलाची आरास करण्यात आली होती सकाळपासूनच भाविकांची दर्शनासाठी अलोट गर्दी झाली होती .

# नांदेड येथे संघर्ष नायिका पुरस्काराने सौ.शितलताई लांडगे यांचा सन्मान

## आयुष्यातील संघर्षाची आठवण करून देणारा भावनिक क्षण–सौ.शितलताई लांडगे

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने मासाहेब जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बीड येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. शितलताई महादेव लांडगे यांना संघर्ष नायिका २०२६ या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.हा पुरस्कार स्वीकारताना आपल्या आयुष्यातील संघर्षमय प्रवास डोळ्यांसमोर उभा राहिल्याने हा क्षण अत्यंत भावनिक असल्याची भावना सौ.शितलताई लांडगे यांनी व्यक्त केली. आंबेडकरी चळवळीत दिलेले योगदान, सामाजिक न्यायाच्या दिशेने सातत्याने केलेले कार्य आणि महिलांच्या हक्कांसाठीचा लढा या अनुषंगाने त्यांची निवड करण्यात आली.या सन्मानाबद्दल त्यांनी श्री.



बा.रा.वाघमारे सर, अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स नांदेडच्या संपूर्ण टीमचे तसेच आयोजक व पुरस्कार निवड समिती प्रमुख ड.सुजाता पोहरे, सह आयोजक शेख शकीला यांचे मनःपूर्वक आभार मानले.या कार्यक्रमासाठी प्रज्ञा वाघमारे,पुणे यांचे विशेष सहकार्य लाभले.संघर्षा तून उभ्या राहिलेल्या एका कर्तृत्ववान महिलेला मिळालेला हा सन्मान अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन केले जात आहे.

# साळिंब्यात वन्य प्राण्यांचा उच्छाद: माकडांच्या हैदोसात शेतकऱ्याच्या सोलर पंपाचे नुकसान

**दैनिक वादळ वार्ता**

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील साळिंबा शिवारात वन्य प्राण्यांचा हैदोस दिवसेंदिवस वाढत असून शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे. हरिण, काळवीट, मोर व माकडांमुळे आधीच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असताना आता शेतकऱ्यांच्या महागड्या सोलर पंपांनाही या प्राण्यांचा फटका बसू लागला आहे.



साळिंबा शिवारातील गट नंबर १७२ मधील शेतकरी अण्णासाहेब कारभारी घुमरे यांच्या शेतात बसविण्यात आलेल्या सोलर पंपाच्या प्लेटवर माकडांनी उड्या मारल्याने सोलर प्लेट पूर्णपणे नादुरुस्त झाली असून वायरिंगही तुटली आहे. संबंधित शेतात ५० गुंठे जमीन असून विद्युत बोअरवर काही महिन्यांपूर्वी सदाशिव सोलर कंपनीचा तीन एचपी क्षमतेचा सोलर पंप शासनाच्या वीज पर्याय योजनेअंतर्गत बसविण्यात आला होता.वीजपुरवठ्याच्या सततच्या अडचणीमुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने सोलर पंप स्वीकारले. दिवसा नियमित पाणी मिळू लागल्याने शेतीला दिलासा मिळाला होता. मात्र वन्य प्राण्यांच्या वाढत्या त्रासामुळे शेतकऱ्यांची ही आशाही मावळू लागली आहे. पिकांचे नुकसान, आणि आता सोलर पंप, प्लेटचे नुकसान यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

या प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी सदाशिव सोलर कंपनीकडे लेखी तक्रार दाखल केली असून वॉरंटी अंतर्गत सोलर प्लेट तात्काळ बदलून देण्यात यावी, नुकसानग्रस्त वायरिंगची दुरुस्ती करावी अथवा नुकसान भरपाई द्यावी, अशी ठोस मागणी केली आहे. कंपनीने त्वरित निर्णय न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही शेतकरी वर्गातून दिला जात आहे.दरम्यान, साळिंबा परिसरात वन्य प्राण्यांच्या वाढत्या उपद्रवाकडे वनविभाग व प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात असून, या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# नांदेड आणि लातुर जुगार अड्ड्यांवर पोलिसांचे छापे पिस्तुलसह ८ लाख ६८ हजाराचा मुद्देमाल जप्त

**दैनिक वादळ वार्ता**

**नांदेड । प्रतिनिधी**

परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या विशेष पथकाने लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि नांदेड शहरातील इतवारा भागात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई केली आहे. या मोहिमेत पोलिसांनी रोख रकमेसह, मोबाईल आणि एक गावठी पिस्तुल असा एकूण ८ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून अनेक आरोपींना ताब्यात घेतले आहे.

दि. २७ जानेवारी रोजी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाईक चौकात रमेश गिरी याच्या जुगार अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत १ लाख ५ हजार २०० रुपये रोख आणि ७० हजार रुपयांचे १२ मोबाईल जप्त करण्यात आले. या प्रकरणी १३ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासोबतच ३० जानेवारी रोजी नांदेडमधील मच्छी मार्केट परिसरातील जुगार अड्ड्यावर पथकाने छापा टाकला. तेथे जुगार खेळणाऱ्या २५ व्यक्तींकडून २ लाख ३४ हजार १०० रुपये रोख आणि ४ लाख २८ हजार रुपयांचे २७ मोबाईल जप्त केले.

इतवारा हद्दीतच जयकिशन ऊर्फ जय राजेशसिंह ठाकूर (वय २१ वर्ष, रा. उल्हासनगर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ३१ हजार ५०० रुपये किमतीचे एक गावठी पिस्तुल आणि ३ जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आले असून त्याच्यावर शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे.


दरम्यान, या दोन्ही ठिकाणच्या कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण ३ लाख ४० हजार रुपये रोख रक्कम,

५ लाख रुपये किमतीचे ३९ मोबाईल, १ गावठी पिस्तुल व ३ जिवंत काडतूस, ज्याची

एकूण किंमत ८ लाख ६८ हजार ८०० रुपये इतकी आहे.

सदर कारवाई सहायक पोलीस निरीक्षक श्रीराम माचेवाड व त्यांच्या पथकातील अंमलदार प्रदिप खानसोळे, संजीव जिंकलवाड, गणेश धुमाळ, कामाजी गवळी आणि विलास सुरवसे यांनी यशस्वी केली. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकास १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास किंवा 'खबर' हेल्पलाइन क्रमांक ९१ ५० १०० १०० वर कळवावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077